# <u>हस्तपुस्तिका क्र.१४</u>

## संस्थेने आपल्या कार्यपूर्तीसाठी आखून दिलेली प्रमाणके

खात्याची (कार्ये) कर्तव्ये पार पाडण्याकरिता निश्चित करण्यात आलेले निकष:-

(1) प्राथमिक चौकशी शक्य तितक्या लवकर पूर्ण करावी. प्राथमिक चौकशीचे आदेश मिळाल्यापासून शक्यतो तीन महिन्यात प्राथमिक चौकशी पूर्ण केली पाहिजे. प्राथमिक चौकशी पूर्ण करण्यास विलंब होत असल्यास त्याचे सविस्तर समर्थन करुन मुदतवाढीकरिता सक्षम अधिकाऱ्यांचे आदेश प्राप्त करण्यात यावेत.

(2) खात्यांतर्गत चौकशी शक्य तितक्या लवकर पूर्ण करण्यात यावी आणि चौकशी करण्याचे आदेश प्राप्त झालेल्या दिनांकापासून सहा महिन्यांपेक्षा जास्त विलंब त्यास लागू नये. चौकशीचा अंतिम अहवाल सादर करण्यास काही अपरिहार्य कारणास्तव असाधारण विलंब होत असल्यास मा.महानगरपालिका आयुक्त यांना त्याची कारणे कळविण्यात यावीत आणि चौकशीसाठी वाढीव कालावधीकरिता त्यांची मंजूरी घेण्यात यावी.

(3) चौकशी अधिकाऱ्याची बदली झाल्यास किंवा चौकशी अधिकारी बदलला गेल्यास नंतर नियुक्त होणारा चौकशी अधिकारी पूर्वीच्या चौकशी अधिकाऱ्याने नोंदविलेल्या पुराव्याच्या आधारे चौकशी पुढे चालू ठेवू शकेल व आवश्यक तो अतिरिक्त पुरावा नोंदवून किंवा अंशत: पूर्वी नोंदविलेला पुरावा व अंशत: स्वत: नोंदविलेल्या पुराव्याच्या आधारे चौकशीची कार्यवाही पूर्ण करु शकेल.

परंतु, ज्यांची साक्ष या अगोदरच नोंदविण्यात आली आहे, अशा साक्षीदारांपैकी कोणत्याही साक्षीदाराची अधिक तपासणी करणे, न्यायहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे, असे नंतर आलेल्या चौकशी अधिकाऱ्याचे मत असेल तर, त्या अधिकाऱ्यास यात यापूर्वीच तरतूद केल्याप्रमाणे अशा कोणत्याही साक्षीदाराला पुन्हा बोलावून त्याची तपासणी, उलटतपासणी आणि फेरतपासणी करता येईल. परंतु असे की, कोणत्याही साक्षीदाराला पुन्हा बोलाविण्यात आले असेल तर महापालिका कर्मचाऱ्यास किंवा त्याच्यावतीने त्यांची उलटतपासणी करता येईल.

उपरोक्त बाबतच्या तरतुदी बृहन्मुंबई महानगरपालिका, प्रमुख अधिकारी (चौकशी) खाते, खात्यांतर्गत चौकशी हस्तपुस्तिका - 2018 मधील प्रकरण क्र.दोनच्या परिच्छेद क्र.2.6 आणि प्रकरण क्र.पाचच्या परिच्छेद क्र.5.6 व 5.15 मध्ये नमूद करण्यात आलेल्या आहेत.

सही/- दि.१४.०५.२०२०

प्रमुख अधिकारी (चौकशी) प्र.